# या विभागाकडून खालील कायद्यांची अंमलबजावणी केली जाते.

१ विद्युत कायदा, २००३ मधील कलम ५३ नुसार विद्युत सुरक्षाविषयक केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा व विद्युत पुरवठासंबंधी उपाययोजना ) विनियम २०१० ची अंमलबजावणी
२ विद्युत कायदा, २००३ मधील कलम १६१ अन्वये व विद्युत अपघात नियम, २००५ अन्वये विद्युत अपघातांची चौकशी करुन संबंधीतास अभिप्राय देणे.
३ विद्युत कायदा, २००३मधील कलम १६२ अन्वये प्राप्त अधिकार व निर्देशित कर्तव्यानुसार कार्य करणे
४ विद्युत कायदा, २००३ मधील कलम १२६ अनुसार परवानाधारकाने उच्चदाब व अतिउच्चदाब ग्राहकांनी केलेल्या अनधिकृत वीज वापर निर्धारणा विरुध्द अपीलप्रकरणी कलम १२७ अन्वये निर्णय देणे.
५ केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा व विद्युत पुरवठासंबंधी उपाययोजना) विनियम २०१० मधील विनियम २९ अन्वये बनविण्यांत आलेल्या नियमानुसार अनुज्ञापक मंडळाचे कामकाज चालविणे.
६ केंद्र शासनाचा घरगुती विद्युत उपकरणे (दर्जा नियंत्रण) आदेश, १९८१ ची अंमलबजावणी.
७ केंद्र शासनाच्या विद्युत वायर्स, केबल्स, उपकरणे व उपसाधने (दर्जा नियंत्रण) आदेश, १९८१, १९८८, १९८९, १९९३ व दर्जा नियंत्रण आदेश,२००३ ची अंमलबजावणी. व विद्युत वायर्स केबल्स, उपकरणे (दर्जा नियंत्रण) आदेश २००५
८ महाराष्ट्र उद्वाहन कायदा, १९३९ व त्याखाली तयार केलेले महाराष्ट्र उद्वाहन नियम, १९५८.
९ महाराष्ट्र विद्युत शुल्क अधिनियम, २०१६ आणि त्याखाली तयार केलेले मुंबई विद्युत कर नियम, १९६२
१० महाराष्ट्र विद्युत विक्रीवरील कर कायदा, १९६३ व त्याखालील केलेले नियम १९६४
११ महाराष्ट्र सिनेमा (विनियम)नियम, १९६६ नुसार मल्टीप्लेक्स सह वीज संचमांडणीचे नकाशा मंजुरी व नाहरकत प्रमाणपत्र देणे.
१२ महाराष्ट्र रज्जूमार्ग कायदा, १९५५ व त्याखाली तयार केलेले महाराष्ट्र रज्जूमार्ग नियम.

# विभागाच्या संबंधाने महत्वपूर्ण बाबी.

१ ११ केव्ही व्होल्टपेक्षा जास्त विद्युत दाब असलेल्या वीज संचमांडणीचे नकाशांना मंजुरी देणे, प्रथम निरीक्षण करणे व परवानगी देणे व वार्षिक निरीक्षण करणे.
२ २० किलोवॅट वरील भार असलेल्या व १५ मीटरपेक्षा जास्त उंची असलेल्या बहुमजली इमारतीच्या वीज संचमांडणीचे नकाशांना मंजुरी देणे, प्रथम निरीक्षण करणे व परवानगी देणे.
३ वीजनिमिर्ती केंद्राचे २०० किलोवॅट क्षमतेपेक्षा जास्त क्षमता असलेल्या पारंपारीक व अपारंपारीक सर्व वीज संचमांडणीच्या नकाशांना परवानगी देणे, प्रथम निरीक्षण करणे व ऊर्जापित करण्यासाठी परवानगी देणे.
४ दर्जा नियंत्रण आदेश,१९८१, १९८८, १९९३ व २००३ अंतर्गत प्रमाणपत्र देणे यासाठी मुख्य विद्युत निरीक्षक हे महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेले " समुचित प्राधिकारी " आहेत.
५ विद्युत ठेकेदारांना अनुज्ञप्ति मंजूर करणे, विद्युत पर्यवेक्षक, तारतंत्री यांच्या परीक्षा घेऊन उत्तीर्ण उमेदवारांना प्रमाणपत्र देणे यांसाठी प्रस्थापित केलेल्या अनुज्ञापक मंडळाचे(मुख्य विद्युत निरीक्षक) हे अध्यक्ष आहेत.